वयोवृद्धः मनोयुवा

**महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम), मुंबई**

संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी क्रमांक : बी.ओ.एम./८४३/८/जीबीबीएसडी दि. २६/११/१९८१
मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नियम १९५० अन्वये नोंदणी क्रमांक : एफ-७५२८ (मुंबई) दि. २५/४/१९८२
कार्यालय पत्ता : ज्येष्ठ नागरिक भवन, सेक्टर १२, प्लॉट नं. ७ सी, गावदेवी मंदिरामागे, नेरूळ (प.), नवी मुंबई - ४०० ७०६.

# फेस्कॉमचे मुखपत्र : मनोहारी मनोयुवा

कार्यालय : अ/७, मिरज-मालगांव रस्ता, सुभाषनगर, ता. मिरज, जि. सांगली - ४१६ ४३७.

वर्ष-३१ अंक-१ जानेवारी २०२३

**सर्व वर्गणीदार, जाहिरातदार, फेस्कॉम चे पदाधिकारी, ज्येष्ठ नागरिक, शेतकरी बंधू-भगिनी यांना प्रजासत्ताक दिन, किसान दिन आणि नववर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा...!**



# आधारस्तंभ



## ज्येष्ठ नागरिक संस्था, रेवदंडा (रायगड)

द्वारा - सुभाष चिटणीस, गणेश कृपा, विठोबा आळी, रेवदंडा, ता. अलिबाग, जि. रायगड.

मोबाईल नं. : ९४०४५५६९२९, ७७७५८८५९७५

१) फेस्कॉम कोकण विभागातील उत्कृष्ट संघ पुरस्कार.
२) आईस्कॉनचा राष्ट्रीय स्तरावरील उत्कृष्ट संघ पुरस्कार.
३) मुंबई तरुण भारतचा ज्येष्ठपर्व सन्मान पुरस्कार
४) आंतरराष्ट्रीय दीर्घायु केंद्र - भारत (आयएलसी-१) चा पुरस्कार.

---




## श्री. सुरेश शांताराम पालकर

**पत्ता** : बी/२०१, कृष्णकृपा को. सोसायटी, जयहिंद कॉलनी, घ.गुप्ते रोड, डोंबिवली (प.) ४२१ २०२.

**जन्मतारीख** : ०८/०४/१९५३ **मोबाईल नं.** : ९८७०४२६१०१

**सेवा** : युको बँकेतून सेवानिवृत्त. सध्या
१) अध्यक्ष, समन्वय समिती ज्येष्ठ नागरिक संघ, डोंबिवली,
२) अध्यक्ष, साई सार्थक ज्येष्ठ नागरिक संस्था, पाथेरली,
३) विश्वकर्मा सुवर्णकार समाज, डोंबिवली, कल्याण विभागीय संस्था

---



## श्री. विलास वा. काळे

**पत्ता** : टीएलके-एन १०१, लाला लजपतराय पथ, नवमयुर को-ऑप. हौसिंग सोसा., टिळकनगर, डोंबिवली (पू.) ४२१ २०१.

**जन्मतारीख** : ०४/०४/१९५१ **मोबाईल नं.** : ९९३०७०६३२९


**शिक्षण** : बी.एससी. (केमि.), एम.ए. (अर्थशास्त्र)

**सेवा** : मुख्य गाडी नियंत्रक व मुख्य परियोजना अधि. प. रेल्वे
सध्या १) अध्यक्ष, टिळकनगर ज्येष्ठ नागरिक संघ
२) सचिव, फेस्कॉम कोकण प्रादेशिक विभाग

---



**श्री. अशोक तेरकर**, अध्यक्ष, फेस्कॉम प्रादेशिक विभाग उत्तर मराठवाडा (नांदेड) यांनी कौन्सिलला रू.१,०००/- देणगी दिलेबद्दल अभिनंदन



**श्री. दिलीप पेटकर**, अध्यक्ष, फेस्कॉम प्रादेशिक विभाग, कोल्हापूर यांनी फेस्कॉमकडे रू.१०,००० /- भरून आश्रयदाते सभासद झालेबद्दल अभिनंदन

# फेस्कॉम - काळाची गरज

श्री. सुरेश पवार

(भाग १)

दि. १२/१२/२०२२ – फेस्कॉनचा वर्धापन दिन.

४२ वर्ष परिपक्क झालेल्या तारुण्याच्या अविष्कारातून, प्रौढत्वाकडे झुकणाऱ्या फेस्कॉम च्या चतुरंग सेनेचा, विजयरथ, नवनवीन कल्पना व पुरोगामी विचार सरणीसह ४३ व्या वर्षात वायू वेगाने दौडत, पदार्पण करीत आहे. ४२ वर्षापूर्वी लावलेला फेस्कॉम हा महा प्रचंड वटवृक्ष, इवल्याशा रोपातून फोफावला आहे, आपल्या पंचहजारी शाखा–रुपी सुरपारंब्या, एक दुसरी कडे झेपावत, बिलगत, गुजगोष्टी करित आहे...मी काय केले, पेक्षा मी काय करु शकेल, हीच भावना उराशी बाळगून, प्रत्येकजणाने फेस्कॉम च्या महायज्ञांत स्वतःला झोकून द्यायला हवे आहे... फेस्कॉम च्या अश्वमेधाचा हा ऐटदार धवल वारु चौफेर उधळत, गांव तेथे संघ ही संकल्पना मनात बाळगून दिग्विजय करायला निघाला आहे, महाराष्ट्राच्या प्रत्येक गावातील ज्येष्ठ नागरिकांच्या मनात आपुलकी, शास्वती, धैर्य, स्थैर्य, मनोबल निर्माण करित गाव तेथे संघ या संकल्पनेला मूर्त स्वरूप देण्याकरिता, वैभवशाली वाटचालीची आपल्या बलशाली, चतुरंग सेनेसह मार्गक्रमणा करित आहे...कालाय तस्मै नमःचा उद्घघोष करित, कात टाकलेली फेस्कॉम जुने जाऊद्या मरणालागी, म्हणत डिजिटल साक्षरता युगात प्रवेश करती झाली, नव्या नवतीच्या चैत्र पालवीने, डवरलेले फेस्कॉम चे हे भविष्यातील विकासात्मक गोजीरे रूप, जितके लोभसवाणे तितकेच विलोभनीय आहे...गाव तेथे संघ ही संकल्पना, तशी सोपी नक्कीच नाही, प्रत्येक गावात, कार्यक्षमता असलेला कार्यकर्ता शोधून, त्याच्या मनोभावनेला हात घालीत, निस्वार्थी बुद्धिने, त्याच्याकडून काम करुन घेणे, सन्मान पूर्वक , त्याला तेथे प्रस्थापित करणे आवश्यक असते...हेच काम करणाऱ्या ज्येष्ठांची खरी गरज आज खेड्यापाड्यात आहे, या करिता अकार्यक्षम वा बेगडी दिखावा करणाऱ्यांना सक्तीच्या निवृत्ती वर पाठवून नवीन सक्षम कार्यकर्त्यांची गुंफण केली पाहिजे... बंधमुक्त सक्षम कार्यकर्ता ही आज काळजी गरज आहे..अजून आपल्या ला फार मोठा पल्ला गाठायचा आहे, फेस्कॉम ला एक नव्या उंचीवर पोहचवणे हे आपले आद्य कर्तव्य आहे, या करिता एकमेकांशी सुसंवाद साधीत तळमळीने काम करणारे कार्यकर्ते हेच आपले खरे भांडवल आहे...मला पद हवे, अवश्य हवे, जरुर हवे हे ही मान्य, पण मी त्या पदाला न्याय देऊ शकतो काय ? नाही देऊ शकलो तर मी बाजूला होईल, असे प्रतिपादन प्रत्येकाने द्यायला हवे, या ही पेक्षा आपण असे काम करुन दाखवून देऊं, की आपले नाव हेच पद झाले पाहिजे... खरे तर काम हेच दैवत समजून काम करणाऱ्यांना कोणत्याही पदाची गरज नसतेच, काम करा नाव आपोआप होते, अन तेच सर्वोच्च पद असते, कधीही न जाणारे...गेली अडीच वर्षे कोरोना बंधांने आपल्याला जखडून टाकले होते, ते जळमट आता हटले आहे... डिजिटली कामात आपण दिवसेंदिवस सक्षम होत आहोत, वानवा आहे ती आपल्यातील चेतना जागृत करण्याची, तसे अशक्य हा शब्द हद्दपार केला तर सर्व शक्य आहे...काम कोण करतो, या पेक्षा काम कोण करित नाही, त्यांच्या अडचणी समजून घेणे, व त्या वर तोडगा काढणे गरजेचे असते, पण मुद्दाम काम न करणाऱ्या ला ही नाकारणे , संस्थेची गरज असते... केल्याने होते आहे रे... आधी केलेच पाहिजे... आजच्या या ४२ व्या वर्धापनदिन दिनाच्या मुहूर्तावर येत्या ७ वर्षाने फेस्कॉम चा सुवर्ण महोत्सवी वर्धापनदिनाचा सोहळा साजरा करतांना प्रत्येक गावात माझा संघ डिजिटली पेक्षाही तत्कालीन कालानुरूप सुसंगत असेल, ही प्रतिज्ञा करु या... कदाचित तेव्हा

आपण नसू ही , पण आपण साकारलेल्या संकल्पनेचा आपला संघ नक्कीच असेल... फेस्कॉम कडे आज प्रेरणादायी पुरक पुरोगामी विचार सरणीचे, प्रगल्भ, बहुआयामी व्यक्तीमत्व असलेले, अध्यक्षीय-उपाध्यक्षीय नेतृत्व आहे, त्यांच्या विलक्षण कामाचा झपाटाही सर्वांना ज्ञात आहे, पण त्यांनाही गरज आहे, सक्रिय सहभाग घेणाऱ्या कार्यकर्त्यांची , साथ हवी, एकीचे बळ हवे, तरच फेस्कॉम च्या जगन्नाथाचा रथ ओढला जाईल...फेस्कॉम च्या आजच्या ४३व्या वर्षात पदार्पण च्या, ४२ व्या वर्धापन-दिनाच्या निमित्ताने सर्व ज्येष्ठ नागरिक बंधू-भगिनींना आरोग्यदायी शुभेच्छा...

(भाग २...)

फेस्कॉम काळाची गरज..नविन जीवन शैली बरोबर जुळवून घेण्याच्या ज्येष्ठांच्या तयारी करिता... भविष्यात काय करावे?

१) आज गरज असलेल्या सर्व संघाची व प्रादेशिक विभागांची पुनर्बांधणी...गरज असलेल्या प्रादेशिक विभागांचे विकेंद्रीकरण, वा समायोजन करुन पुनर्बांधणी करण्यात यावी...

२) ज्या प्रादेशिक विभागांमध्ये, बंद झालेल्या संघाचे पदाधिकारी पदहीन झाले असतील त्यांची प्रादेशिक विभाग अध्यक्षाने प्रत्यक्ष जागेवर जाऊन शहानिशा करणे, शक्य असल्यास नवीन व्यक्तीकडे जबाबदारी सोपविणे, अथवा तो संघ बरखास्त करून नवीन संघाची उभारणी करणे, व त्यांच्या कामाचा सतत पाठपुरावा करणे...*

३) प्रत्येक प्रादेशिक विभागाचे मुख्यालयाने,प्रत्येक तालुक्यातील तालुकाध्यक्ष हे पद निश्चित करुन, त्या तालुकाध्यक्षा कडून दर तीन महिन्यात रिपोर्ट घेणे...

४) गाव पातळीवर झालेल्या बदलाची नोंद मुख्यालयात ६ महिन्यात करण्यात यावी हे बंधन तालुका अध्यक्षावर असावे, अकार्यक्षम तालुका अध्यक्ष बदलण्याचे आधिकार, एकदा परत संधी दिल्यानंतर प्रादेशिक मुख्यालयास असावे...

५) प्रादेशिक विभागाची पुनर्बांधणी करण्याचे अधिकार फेस्कॉम मुख्यालयास आहेच, शिवाय जर फेस्कॉम च्या अध्यक्षांचे कार्यालयीन कामकाज एखाद्या प्रादेशिक विभागातून वेळेवर सूचना देऊन ही पूर्ण होत नसेल तर, तर समज देण्यात यावी, या उप्पर उर्वरित कालावधीत फेस्कॉम मुख्यालयाने प्रतिनिधी पाठवून योग्य ते नियोजन करावे...

६) जिल्हा, तालुका, गाव पातळी पर्यंत सेवाभावी कार्यकर्त्यांची फळी उभारणे, व त्यांना, नियमित प्रोत्साहित करण्यासाठी, शाब्दिक सत्कार करुन गुण विशेषाने - गौरवण्यात यावे...

७) नवीन प्रगतीशील युगात डिजिटली परिपक्वता ही महत्त्वाची भूमिका बजावणार आहे, त्या दृष्टीने फेस्कॉम ने बराच पुढचा टप्पा गाठला आहे, तरीही अजून अपूर्णता आहे, त्या करिता नवीन कार्यकर्ता वा पदाधिकारी हा डिजिटली जाणकार असणे ही काळाची गरज आहे...

८) गाव तेथे संघ, व असावा ज्येष्ठ डिजिटली श्रेष्ठ,, हे आपले कालानुरूप बोध वाक्य आहे...व ते पूर्ण करणे आपले कर्तव्य आहे...

९) काही कारणाने घटनेच्या नियमांची अडचण येत असेल तर महासंघाचे प्रगती करिता सुधारणा करणे हे इष्ट राहिल.. ज्येष्ठ शक्तीचा विजय असो.

* * *

# अभ्यास–शासन निर्णय /परिपत्रक

फेस्कॉम चळवळीतील प्रत्येक पदाधिकारी हा केवळ पदाधिकारी न राहता क्रियाशील कार्यकर्ता व्हावा असा प्रयत्न सुरु आहे. या प्रयत्नांचाच एक भाग म्हणून फेस्कॉमने २/३ ऑगस्ट २०२२ पासून दरमहा प्रशिक्षण विभागाचे अध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष, उपाध्यक्ष, संपर्क/संघटक सचिव, जिल्हा समन्वय समितीने अध्यक्ष, सचिव वगैरे पदाधिकारी यांना प्रशिक्षित केले असून २३ व २४ डिसेंबर २०२२ रोजी महिला पदाधिकारी यांना प्रशिक्षण दिले आहे. महिला पदाधिकारी यांना प्रशिक्षण हे वैशिष्ट्यपूर्णच म्हणावे लागेल. कारण यामध्ये प्रशिक्षण घेणारे महिला पदाधिकारी असून त्यांना प्रशिक्षण देणारे केवळ महिला पदाधिकारीच होते.

फेस्कॉमने प्रशिक्षण शिबीरे घेतली पण सदरचे प्रशिक्षणाचा पाझर जिल्हा/ तालुका स्तरावर पोहचला नाही, याची खंत फेस्कॉम वर्धापन दिनाचे कार्यक्रमात दिसून आली. अध्यक्ष व पदाधिकारी यांनी घेतलेल्या प्रशिक्षणाचा लाभ जिल्हा स्तरावर प्रशिक्षण शिबीरे घेवून इतर पदाधिकारी यांना प्रशिक्षण देणे आवश्यक होते. घेतलेल्या प्रशिक्षणाचे साध्य नविन संघ, अक्रियाशील संघ क्रियाशील करणे, वर्गणी संकलन करणेत वृध्दी याद्वारे निष्पन्न होणे आवश्यक होते. त्याचप्रमाणे काही पदाधिकारी यांचे अज्ञान देखील दिसून आले. सुधारीत घटना दुरुस्ती, दि.०९/०७/२०१८ चा धोरण अंमलबजावणीचा निर्णय दि. ३१/१०/२०१९ चा सनियंत्रण समितीबाबत शासन निर्णय आर्थिक लाभाच्या योजनेबाबत दि.२०/०८/२०१९ चा शासन निर्णय आईवडील आणि ज्येष्ठ नागरिक चरितार्थ व कल्याण कायदा २००७ नियम २०१०, ओळखपत्राबाबतचे शासन निर्णय इत्यादींचा पूर्ण अभ्यास करणे आवश्यक आहे. अध्यक्ष मा. अरुण रोडे आणि भवन समितीचे अध्यक्ष मा. ना.ना. इंगळे यांनी सर्वांना उपयुक्त दोन पुस्तके सर्व उपस्थितांना दिली आहेत. काही परिपत्रके सोबत दिलेली आहेत. प्रशिक्षण शिबीरात सर्व शासन निर्णय/ परिपत्रकाबाबत विविध वक्त्यांनी मार्गदर्शन केले आहे. याचा पुनश्च एकवेळ अभ्यास करा, आत्मसात करा. जिल्हा/तालुका स्तरावर प्रशिक्षण शिबीरे अयोजित करुन प्रामुख्याने प्रादेशिक विभागाचे अध्यक्ष यांनी सदर प्रशिक्षणाचा लाभ शहरी/ ग्रामीण भागातील ज्येष्ठ नागरिक संघापर्यंत पोहचवावा. याद्वारा नविन संघ निर्मिती/ संघ क्रियाशील करणे आणि वार्षिक वर्गणीत वृध्दी यामध्ये प्रादेशिक विभागाच्या प्रगतीत चालना मिळणार आहे.

परिपत्रके अ.क्र. २० प्रमाणे.

***

# ''फेस्कॉमची प्रशासकीय वाटचाल''

श्री. अरुण माधव रोडे,
अध्यक्ष, महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम)
मोबा. नं. ९८५०८८८४३७५

मार्च २०२०, कोविड-१९, कोरोना महामारीने सर्व जगाला वेठीस धरले होते. सर्व जग हे बंदीशाळा झाले होते. जनजीवन विस्कळीत झाले होते. आर्थिक व्यवहार ठप्प झाले होते. मिडियाकडून कोरोना बाधितांचे रोज लाखांचे आकडे येत होते. टि.व्ही., वृत्तपत्र, वाहिन्यांवरुन कोरोनाचे भेसूर चित्र जगापुढे येत होते. कोरोना पॉझिटिव्ह, कोरोनाचा डेथ रेट, हॉस्पिटलमध्ये बेडची कमतरता, ऑक्सिजनचा तुटवडा, कोरोना टेस्ट, कोरोना पॉझिटिव्हची हॉस्पिटलमध्ये बेड मिळवण्यासाठी आटापिटा, सर्वच चित्र भेसुर व भितीदायक होते. राज्यबंदी, जिल्हाबंदी, इ-पास शिवाय प्रवेश नाही, प्रवास नाही, शाळा, कॉलेजस, मॉल, जिम, चित्रपटगृह, नाट्यगृह, ऑफिसेस् बंद ! ''वर्क फ्रॉम होम सुरु !''

मित्रांनो, मार्च २०२० चे जवळजवळ ऑक्टोंबर २०२१ हा जीवघेणा प्रवास आपण सर्वांनी अनुभवला आहे. आता मार्च २०२१ पासून लसीकरणाला सुरुवात झाली. पहिला व दुसरा लसीकरणाचा डोस शंभर कोटीपर्यंत पोहोचविण्याचा विक्रम भारताने केला. हळुहळू कोरोनाचा अंधःकार नष्ट होऊन प्रकाशाची दालने उघडायला सुरुवात झाली आहे. सर्व अत्यावश्यक ते उपाय पाळत- मास्क लावणे, सॅनिटायझरने हात धुणे, सोशल डिस्टंसिंग पाळणे, गर्दीत जाणे टाळणे ही पथ्ये पाळत अजून काही दिवस अशीच जगरहाटी चालू राहणार आहे.

आपण सर्व ६०+ ज्येष्ठ आहोत. या सर्व कठीण प्रसंगातून आपण तावून-सलाखून बाहेर पडलो आहोत. माझ्यासारखे अनेक ''कोरोना योध्दे'' आपणात आहेत. कारण आपण त्यातूनही सहीसलामत बाहेर पडलो ही आपणा सर्वांच्या सदिच्छा व देवाचीच कृपा आहे. पण आता या अंधःकारातून आपली वाटचाल प्रकाशाकडे न्यावयाची आहे. फेस्कॉम ही आपली संघटना ४१ वर्षे ज्येष्ठांसाठी त्यांचे उर्वरित आयुष्य सुखी, समाधानी, आरोग्यपूर्ण, निरामय व सन्मानाने जावे यासाठी प्रयत्नशील आहे व हे व्रत सध्या आपण काम करत असलेल्या फेस्कॉम परिवारातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांचे आहे. यासाठी यापुढे फेस्कॉमला प्रगतीपथावर नेऊन जगमान्य करण्यासाठी पुढील आपली प्रशासकीय वाटचाल कशी असणार आहे, याबाबत मी माझे विचार या लेखात लिखित स्वरुपात मांडणार आहे व ते सर्वांनी प्रत्यक्षात अंमलात आणावयाचे आहेत.

चला तर मग आपण आता या कोरोनाच्या एक ते दीड वर्षाच्या अंधःकाराला झुगारुन, प्रकाशाकडील वाटचालीत सामिल होऊ या. यासाठी पुढील वाटचाल, धोरण आपण प्रत्यक्षात अंमलात आणू या.

**१) फेस्कॉमचे अंगीकृत उद्दिष्ट-**

आपली संघटना पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० व सोसायटी ॲक्ट १८६० ची नोंदणीकृत संघटना आहे. आपली एक घटना आहे. नियम-नियमावली त्याला धरुन आपणांस आपले कामकाज करावयाचे आहे. त्यासाठी नुकतीच सुधारित घटना जी मा.धर्मादाय आयुक्त यांच्या चेंज रिपोर्टने मंजुरी दिली आहे, त्या घटनेचे फेस्कॉमची कार्यप्रणाली व मार्गदर्शिका यांचे वाचन फेस्कॉमचे सर्व पदाधिकारी यांनी प्रथम करावे. त्यासाठी नेरुळ येथे जानेवारी २०२२ मध्ये दोन दिवसाची निवासी ''ऑफलाईन'' कार्यशाळा, मुख्यालय/प्रादेशिक विभागाचे पदाधिकारी यांचेसाठी आयोजित केले आहे. प्रकट वाचनाने यातील दिलेले हक्क, कर्तव्य व जबाबदाऱ्या नीट समजावून घेणे हे पहिले कार्य आपणांस करावयाचे आहे.

**२) फेस्कॉमचे डिजिटल अकॅडमी (FDA)-**

लॉकडाऊन काळात आपण प्रत्यक्ष भेटू शकत नव्हतो. तेव्हा झूम ॲपवर रजिस्ट्रेशन केले व दिनांक

२६ सप्टेंबर २०२० पासून सर्व कामकाज हे ऑनलाईन वेबिनारवर चालू केले. अविनाश लकारे यांचे अध्यक्षतेखाली ''फेस्कॉम डिजिटल अकॅडमीची'' रितसर स्थापना दि.१३/०४/२०२१ रोजीला पुणे विद्यापीठाचे कुलगुरु मा.नितीनजी करमळकर यांचे शुभहस्ते केली व आता २००चे वर वेबिनार संपन्न झाले. यात अविनाश लकारे यांचे योगदान मोठे आहे. आता फेस्कॉमचे सर्व कामकाज पेपरलेस करुन व्यवहाराच्या सर्व नोंदी पूर्ण करणेसाठी मुख्यालय व प्रादेशिक विभागांनी डिजिटल साक्षर होऊन कामाला लागले पाहिजे.

**पहिला टप्पा-** १२ प्रादेशिक विभागातील जिल्ह्यातील सर्व संलग्न संघाची विहित नमुन्यात इंग्रजीतील यादी तयार करुन पाठविणे. आज अखेर मुंबई, कोकण, पुणे या तीन प्रादेशिक विभागातील दहा जिल्हेच कव्हर झाले आहेत. अजून ९ प्रादेशिक विभाग व २६ जिल्ह्यांचे काम बाकी आहे. ते सर्व डिसेंबर २०२१ अखेर पूर्ण करणेसाठी प्रादेशिक विभागांनी कामाला लागून पहिला टप्पा यशस्वी केला पाहिजे.

त्यानंतर समन्वय समित्या संलग्न संघाचे सभासद सर्व आर्थिक व्यवहार, नियामक मंडळ, वार्षिक सभा, इतिवृत्त, इन्कमटॅक्स, धर्मादाय आयुक्तांकडील पत्रव्यवहार, शासकीय पत्रव्यवहार, पदाधिकारी यांची माहिती सर्व प्रशासकीय कामकाजाच्या नोंदी सुरुवातीपासून गठित करण्याचे मोठे काम पूर्ण करावयाचे आहे. त्यासाठी सर्व प्रादेशिक विभाग व पदाधिकारी यांचे सहकार्य पाहिजे, त्याशिवाय हे काम पूर्ण होणार नाही. हा आपला प्रशासकीय कामाचा दुसरा महत्त्वाचा टप्पा आपणा सर्वांना गाठावयाचा आहे. याची मनाशी पक्की खूणगाठ बांधा.

**३) संघ, सभासद व पदाधिकारी सक्रिय करणे-**

आपण स्टेजवर भाषण करताना, भारतात १४ कोटी ५० लाख ज्येष्ठ नागरिक आहेत तर महाराष्ट्रात १ कोटी ४० लाख आहेत असे आवेशपूर्ण आवाजात सांगतो पण..... आज फेस्कॉमच्या ४१ वर्षाच्या वाटचालीत महाराष्ट्रातील ३६ जिल्हे, २५७ तालुका व ४०२३३ गावातील फक्त ५००० पर्यंत ज्येष्ठ नागरिक संघ व जेमतेम ९ ते १० लाख सभासद क्रियाशील आहेत. हा तर पुढचा प्रश्न. तेव्हा आता 'गाव तिथे संघ'' हा नारा व त्याप्रमाणे सर्व बारा प्रादेशिक विभाग, मुख्यालयाचे सर्व पदाधिकारी यांनी जिल्हा, तालुका, गाव, वस्ती, पाडे यांचा सर्व्हे करुन सर्व ६०+ चे ज्येष्ठ फेस्कॉमच्या छायाछत्राखाली आणणे व सर्व संघ, सभासद, जुने नवे, सक्रिय करणे हे काम हाती घेतले पाहिजे.

सन २०१९/२०२२ मध्ये वर्षभरात १५३ नवीन संघ झाले. तर सन २०२०/२०२१ मध्ये फक्त ५३ नवीन संघ झाले. लॉकडाऊन मुळे जरी हे चित्र दिसत असले तरी आता प्रत्येक जिल्ह्यात दरमहा किमान आठवड्याला एकतरी नवीन संघ निर्माण झाला पाहिजे. यासाठी फेस्कॉमची मार्गदर्शिका वाचावी व गाव पातळीवर संघटक, संपर्क सचिव व पदाधिकारी यांनी ''गाव तिथे संघ'' निर्मितीला चालना द्यावी.

फेस्कॉमला संलग्न होताना प्रत्येक संघाने फेस्कॉमची घटना आमचेवर बंधनकारक आहे व त्यातील अंगीकृत उद्दिष्टाप्रमाणे आम्ही कार्य करु असे लिहून दिले आहे. तेव्हा सर्व ज्येष्ठ नागरिक संघाचे दफ्तरी फेस्कॉमची सुधारित घटना, कायृनिर्देशिका व मार्गदर्शिका ही असली पाहिजे. बारा प्रादेशिक विभागांनी त्यांचे पदाधिकारी व संलग्न संघांना या पुस्तकांच्या प्रती तसेच शासनाचे धोरण, आर्थिक लाभाच्या योजना व ज्येष्ठांना उपयुक्त कायदे यांच्या पुस्तिकांचे वितरण केले पाहिजे. त्याचप्रमाणे संघाची वार्षिक वर्गणी नियमितपणे त्या त्या आर्थिक वर्षाची घटनेतील तरतुदीनुसार सभासद संख्येप्रमाणे विकासनिधी व मनोहारी मनोयुवाचे वार्षिक वर्गणीसह वेळेत म्हणजे ३१ मे चे आत भरली पाहिजे. तरच ते निवडणूक प्रक्रियेत भाग घेऊ शकतील. अपुरी वर्गणी भरणारे निवडणुकीस पात्र राहणार नाहीत याची दक्षता घ्यावी लागेल. नियमित वर्गणी बरोबरच त्यांचे आरोग्य, संरक्षण, आत्मसन्मान व कलांना वाव देणारे

सामाजिक उपक्रम राबविणे हे संघ व सभासद सक्रिय क्रियाशील करण्याचे उद्दिष्ट- प्रादेशिक विभागांनी समन्वय समित्यांचे मार्फत राबविले पाहिजे तसेच प्रादेशिक विभागांनी तिमाही अखेर जमा रकमांपैकी प्रवेश फी १००%, वार्षिक वर्गणी ५०%, विकास फंड ३%, पैकी १% व मनोहारी मनोयुवाची वार्षिक वर्गणी पूर्ण तपशिलासह मुख्यालयाचे बँक खाती व मनोयुवा कौन्सिलचे बँक खाती वेळेत जमा केले पाहिजे.

**४) अर्थविषयक व निधी संकलन–**

फेस्कॉम घटनेत ''अर्थविषयक व निधी संकलन'' समिती ही महत्त्वाची समिती मानली आहे. या समितीचे मार्फत मुख्यालय व प्रादेशिक विभागात फेस्कॉमला निधी उपलब्ध करुन देणेसाठी काही तरतूदी दिल्या आहेत. घटनेतील पान नंबर ८ व ९ मध्ये त्या आहेत.

* संलग्न संघाच्या वार्षिक वर्गणी बाबतचा संघ शुल्क हे सभासद संख्येवर आहे तसेच विकास निधी तो वर उल्लेख केल्याप्रमाणे नियमित दरवर्षी घ्यावयाचा आहे.

* सहयोगी सभासद–व्यक्तिगत- फेस्कॉमच्या सरचिटणीसांकडे साध्या कागदावर अर्ज करुन रु.१,०००/- भरुन सहयोगी सभासद करुन घेणे.

* आश्रयदाता/हितचिंतक सभासद- फेस्कॉमला एकाचवेळी रु. १०,०००/- रकमेची देणगी देणारा आश्रयदाता सभासद तर, रु. ५,०००/- देणगी देणारा हितचिंतक सभासद अर्ज व देणगी दिल्यावर नियामक मंडळ यांना सभासद करुन घेऊ शकेल. मात्र या सहयोगी, आश्रयदाता व हितचिंतक सभासदाला तो सभासद झाल्यावर हक्क व विशेष हक्क मिळण्यास पात्र राहतील. परंतु नियम ६.२.२ प्रमाणे फेस्कॉममध्ये कोणतेही पदधारण करण्याचा किंवा इतर संस्थांवर प्रतिनिधीत्व करण्याचा हक्क असणार नाही. या मार्गाने व देणगी जाहिरातीचे मार्गाने फेस्कॉमला निधी उपलब्ध करुन देण्यासाठी या निधी संकलन समितीने संघटक–सचिव, संपर्क–सचिव व पदाधिकारी यांचेमार्फत नियोजनपूर्वक घटनेला बाधा न येता काम केले पाहिजे.

* देणगी दिल्यास 80G ची सवलत आहे व फेस्कॉमने 80G खाली दाखला मिळवला आहे. यासाठी 80G च्या तरतुदींचा आधार घेणे व फेस्कॉमला अंगीकृत उद्दिष्टपूर्तीसाठी आर्थिकदृष्ट्या निर्भय करणे गरजेचे आहे.

**५) अंतर्गत तपासणी अधिकारी–**

मुख्यालय, प्रादेशिक विभाग व समन्वय समित्यांचे दर तपासणी आर्थिक व्यवहारांचे तपासणीसाठी तसेच संघ वर्गणी घटनेतील तरतुदीप्रमाणे जमा होते कां? पाहण्यासाठी सर्व प्रादेशिक विभागांनी व मुख्यालयाने अंतर्गत तपासणी अधिकारी नेमणे आवश्यक आहे. त्यांनी आर्थिक व्यवहार, किर्द, खतावणी, नावे व्हॉचर्स, जमा पावती, पुस्तके, बँक व्यवहाराचे पासबुक, चेकबुक यावरुन तपासून रिपोर्ट वेळीच प्रादेशिक विभाग व मुख्यालयाकडे पाठविलेपाहिजेत. अंतर्गत तपासणी अधिकारी नेमताना त्याला अकौंटची चांगली जाण पाहिजे व निरपेक्ष भावनेने काम केले पाहिजे.

**६) कार्यशाळा–**

फेस्कॉम डिजिटल अॅकॅडमीच्या माध्यमातून नेरुळ येथे तिसरा मजला हा खास एज्युकेशन पर्पजसाठी उपयोगात आहे. तिथे फेस्कॉम पदाधिकारी यांच्यासाठी दोन दिवसांचे निवासीवर्ग सुरु करावयाचे आहेत. ह्यात खालील विषय राहतील.

* डिजिटल साक्षरता

* केंद्र व राज्याचे ज्येष्ठांप्रती धोरण

* ज्येष्ठांसाठी आर्थिक लाभाच्या योजना (जीआर)

* ज्येष्ठांसाठी उपयुक्त कायदे

* डॉ.राधाकृष्ण भट व्याख्यानमालेतून विचार प्रवर्तक व्याख्यानमाला.

* कृतिशील ज्येष्ठत्व

* ज्येष्ठांचे आरोग्य, सुरक्षा व त्यांच्या कलागुणांना वाव देणारे कार्यक्रम उदा. गायन, वादन, नृत्य, लेखन, काव्य वक्तृत्व, इ. याबरोबरच प्रादेशिक विभागांनी इतर

वेळेत हे उपक्रम आपापल्या जिल्ह्याच्या, तालुक्याच्या, गावात राबवावेत. त्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था, शैक्षणिक संस्था, महाविद्यालये, विद्यापिठे यांचे सहकार्य घ्यावे. शक्यतो यासाठी प्रायोजक शोधून हे समाजाभीमुख काम समजून चालना द्यावी.

**७) जिल्हा ज्येष्ठ नागरिक समन्वय सनियंत्रण समिती–**

महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यातील जिल्हाधिकारी व समाज कल्याण खात्यामार्फत ''जिल्हा ज्येष्ठ नागरिक समन्वय सनियंत्रण समिती'' गठीत करण्यात आली आहे. त्यात फेस्कॉमचे दोन प्रतिनिधी सदस्य म्हणून घेतले आहेत. प्रादेशिक विभागाकडून माहिती मागिवली असता अद्यापही जालना/हिंगोली/अहमदनगर/लातूर/उस्मानाबाद/ बीड/ परभणी/गोंदिया/ वर्धा या ९ जिल्ह्यात फेस्कॉम प्रतिनिधी दिल्याची माहिती लिखित स्वरुपात प्राप्त झालेली नाही. वारंवार पाठपुरावा करावा लागतो. ज्या जिल्ह्यात दोन प्रतिनिधी नियुक्त केले त्यांचे तसे नियुक्तीचे पत्र व सभेनंतरचे इतिवृत्त पाठवावे असे कळविले आहे. व्हॉट्स ॲपवर काही टाकतात पण हार्ड कॉपी मुख्यालयाकडे रेकॉर्डसाठी देणे गरजेचे आहे. व त्या सभेत प्रकर्षाने ज्येष्ठांचे प्रश्न मांडले गेले पाहिजेत. या उपक्रमाचा लाभ ज्येष्ठांचे प्रश्न मा. जिल्हाधिकारी व मा. समाज कल्याण अधिकारी यांचे पर्यंत पोहचविण्याचा मार्ग हाताळला गेला पाहिजे. याबाबत मुख्यालय उपाध्यक्ष श्री. विजय औंधे व अण्णासाहेब दानोळे यांनी पुढाकार घेऊन पाठपुरावा करुन लिखित माहिती मिळविण्याचा प्रयत्न करावा.

**८) आईवडील व ज्येष्ठ नागरिक चरितार्थ व कल्याण कायदा २००७ व नियम २०१०**

या कायद्यान्वये बेघर, अत्याचारग्रस्त, पिडीत, शोषित, वंचित, एकाकी वृध्दांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रत्येक प्रादेशिक विभागात मुख्यालयाप्रमाणे ''मोफत कायदेविषयक सल्ला केंद्र'' चालू करावे. सेवाभावी वकील नेमावेत व पीडितांना निर्वाहभत्ता व न्याय मिळवून द्यावा. अशा सूचना देण्यात आल्या आहेत. त्याप्रमाणे प्रादेशिक विभागांनी नियुक्त वकिलाची माहिती तसेच विभागवार किती केसेसवर काम चालू आहे? यशस्वी केसेस् किती? पेंडिंग काम चालू असलेल्या केसेस् किती व प्रत्येक जिल्ह्याच्या समाज कल्याण खात्याकडील वरीलप्रमाणे माहिती घेऊन ती मुख्यालयातील कायदेविषयक सल्ला समितीकडे ॲड. बी.टी. निसळ यांचेकडे वरील माहिती पाठवित जावी. याबाबत ठिकठिकाणी कार्यशाळा व डॉ.राधाकृष्ण भट व्याख्यानमालेच्या माध्यमातून जागृतीचे काम हाती घ्यावे. यशदामार्फत प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी 'डिस्ट्रिक्ट ॲन्डमिनिस्ट्रेटिव्ह ट्रेनिंग सेंटर' आहे. मी व ॲड. बी.टी. निसळ त्याठिकाणी जाऊन याबाबतचे प्रशिक्षण राज्य कर्मचारी यांना सन २०१८ पासून देत आहोत. सर्व प्रादेशिक विभागांनी हे काम हाती घ्यावे.

**९) फेस्कॉमची राज्यस्तरीय प्रादेशिक विभागीय अधिवेशने/ महिला मेळावे/ मनोयुवा मेळावा/ डॉ. राधाकृष्ण भट व्याख्यानमाला–**

ही सर्व समाजप्रबोधनाची साधने आहेत. यासर्वांसाठी एक समिती गठीत व्हावी त्यातून दर दोन वर्षांनी राज्यस्तरीय व प्रादेशिक अधिवेशने, ८ मार्च जागतिक महिला दिनी महिला मेळावा, दरवर्षी मनोयुवाचा मेळावा व दरवर्षी प्रत्येक प्रादेशिक विभागात सातत्याने डॉ.राधाकृष्ण भट व्याख्यानमाला यांचे आयोजन झाले पाहिजे. याबाबत फेस्कॉम कार्यनिर्देशिकेत पान नंबर ५६ ते ५९ मध्ये परिपूर्ण माहिती दिली आहे. त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी. तसेच अधिवेशनात बारा प्रकारचे पुरस्कार दिले जातात. त्यासाठी प्रायोजक शोधणे, पुरस्कार निधी संकलित करुन व ती रक्कम मुदत ठेवीत गुंतवणूक करुन त्याच्या व्याजातून पुरस्कार त्या त्या नावाने दिला जावा. निधी संकलनाचा हा एक मार्ग आहे. अधिवेशनानंतर सर्व आर्थिक व्यवहार पूर्ण करुन ती चार्टर्ड अकौंटंट यांचेकडून प्रमाणित करुन व शिल्लक निधीचे चे

५०% मुख्यालय ५०% प्रादेशिक विभाग व प्रायोजक यांच्यात विभागणी करुन सर्व दफ्तर मुख्यालयात जमा केले गेले पाहिजे. याबाबत वारंवार पाठपुरावा करावा लागू नये.

**१०) शासनाकडील प्रलंबित प्रश्न–**

महाराष्ट्र शासनाकडे गेली १०/१५ वर्षे आपण सातत्याने आपले प्रश्न मागण्या मांडत आलो आहोत. यासाठी वारंवार निषेधमोर्चे/ मूकमोर्चे/ लाक्षणिक उपोषण/ धरणे आंदोलन/ पत्रकार परिषदा/ मंत्रालयावर मार्चा हे सर्व प्रकार अवलंबिले आहेत. तरीही,–

* आर्थिक लाभाच्या योजनांसाठी वय ६५ आहे ते ६० केलेले नाही.
* स्मार्टकार्ड ऐवजी तहसिलदार सहीचे ओळखपत्र प्रवासात ग्राह्य धरावे ही मागणी प्रलंबित आहे.
* महात्मा फुले जन आरोग्य योजनेत दारिद्र्य रेषेची अट काढूीन सरसकट सर्व ६०+ ला ही योजना लागू करावी यावर निर्णय नाही.
* एकूणच कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु.२१,०००/– चे आत व दारिद्र्य रेषेखालील ही अट काढून टाकली नाही.
* ज्येष्ठांचे दोन प्रतिनिधी विधान परिषदेवर नियुक्त करावेत यावर विचार नाही.
* ज्येष्ठांसाठी शासकीय खर्चात सर्वत्र विरंगुळा केंद्र निर्मिती.
* वृध्दाश्रमातील वृध्दांचे दरमहा रु.९००/– चे अनुदान वाढवून मिळणे.
* इतर आर्थिक लाभाच्या योजनावर रु.१,०००/– दरमहा देतात ते दारिद्र्यरेषेची अट काढून सरसकट ६०+ ला दरमहा किमान रु.५,०००/– द्यावेत. या सर्व मागण्या मान्य झालेल्या नाहीत.

फेस्कॉमचे उपाध्यक्ष श्री.अण्णासाहेब टेकाळे हे विशेष प्रयत्न करत आहेत. त्यासाठी परत एकदा आंदोलनाचा पवित्रा घ्यावा लागेल.

सर्व प्रादेशिक विभागांनी आपापल्या प्रभागातील आमदारांना भेटून त्यांना याबाबत जागृत करणे गरजेचे आहे.

**११) फेस्कॉमचे मुखपत्र– मनोहारी मनोयुवा–**

''मनोहारी मनोयुवा'' हे फेस्कॉमचे मुखपत्र. सन १९९३ला सुरु झालेले हे मुखपत्र डोंबिवली, नाशिक, औरंगाबाद, कोल्हापूर, अकोला, करत करत आता सांगली येथून प्रकाशित होत आहे. द्वैमासिक असलेले हे मुखपत्र अकोला येथून मनोयुवा कौन्सिलचे प्रमुख श्री.ना.ना. इंगळे यांनी जानेवारी २०१८ पासून मासिक स्वरुपात सुरु केले व ते आता सांगली येथून मनोयुवा कौन्सिलचे प्रमुख श्री.अंजुमन खान हे हा वारसा समर्थपणे पुढे चालवत आहेत. ज्येष्ठ नागरिक चळवळीला वाहिलेले हे मासिक आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य पातळीवरील व संघटना पातळीवरील ज्येष्ठ नागरिक चळवळीला उपयुक्त माहिती वाचकांना पुरवीत असते. या फेस्कॉमच्या प्रबोधनात्मक कामासाठी मनोहारी मनोयुवाचे आधारस्तंभ वर्गणीदार वाढवून फेस्कॉमचे कार्य सर्वदूरवर पोहोचविण्यासाठी संलग्न संघ, त्यांचे सभासद व पदाधिकारी व संघटनेतील कार्यकर्ते यांनी कार्यशील राहावे. मासिकाचा दर्जा सातत्याने वाढता राहील याची काळजी घेतली जावी.

**१२) महाराष्ट्रातील विद्यापीठे व ज्येष्ठ नागरिक सहायता कक्ष–**

महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांमध्ये ''ज्येष्ठ नागरिक सहायता कक्ष'' निर्माण करणे हे फेस्कॉमचे पुढील आवाहन आहे. मे २००८ ला ''सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात'' त्यावेळचे कुलगुरु मा. नरेंद्र जाधव साहेब यांचे हस्ते ''ज्येष्ठ नागरिक सहायता कक्षाची'' स्थापना झाली. प्रा. तेज निवळीकर हे संचालक म्हणून काम पाहत होते. त्यावेळेपासून मी या ज्येष्ठ नागरिक सहाय्यता कक्षात त्यांचेबरोबर व्याख्याता म्हणून २००८ पासून काम पाहत होतो. आता २०१५ पासून ''अँडव्हायझरी कमिटी'' सदस्य आहे. पुण्याप्रमाणे आता उत्तर मराठवाडा नांदेड,

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, उत्तर महाराष्ट्र जळगांव या विद्यापीठांमध्ये ज्येष्ठ नागरिक सहायता कक्ष निर्माण झाले आहेत. उर्वरित विद्यापीठांमध्ये हे काम सुरु करणेसाठी संबंधित प्रादेशिक विभागांनी प्रयत्न करावेत. मुख्यालयाची व आता फेस्कॉमच्या ''संशोधन-नियोजन-ज्ञान विस्तार'' समितीचे प्रमुख प्रा. तेज निवळीकर यांचीही मदत घ्यावी. ज्येष्ठांच्या प्रश्नावर विद्यापिठांचा परिस स्पर्श झाला तर अकॅडमिक पातळीवर कार्यशाळा, व्याख्यानमाला, शिबिरे असे उपक्रम हाती घेता येतात. त्यादृष्टीने पुढील वाटचाल करताना या बाबीला विशेष प्राधान्य दिले गेले पाहिजे.

**१३) फेस्कॉमचा इतिहास–**

डिसेंबर २०१९ ला फेस्कॉमचे राज्यस्तरीय अधिवेशन नांदेड येथे संपन्न झाले. त्यांच्या आदल्या दिवशी नियामक मंडळ अशा संपन्न झाली व त्यात फेस्कॉमचा ४१ वर्षाचा इतिहास लिहिण्यासाठी एक समिती नियुक्त केली व इतिहास लेखनाचे काम नांदेडचे डॉ. बा.दा. जोशी यांना ठरावाद्वारे एकमताने देण्यात आले. त्यांना आवश्यक ते सर्व संदर्भ देण्यात आले आहेत व त्यांचे इतिहास लेखनाचे काम चालू झाले आहे. मुख्यालय व प्रादेशिक विभागांना तसेच आजी माजी पदाधिकारी यांना विनंती की त्यांनी त्यांचे कार्यकाळातील सर्व संदर्भ कागदपत्रे उदा. अधिवेशनाच्या स्मरणिका, मनोहारी मनोयुवाचे सुरुवातीपासूनचे अंक, मुख्यालय व प्रादेशिक विभागांचे वार्षिक अहवाल, अधिवेशन, मेळावे, कार्यक्रमाचे फोटो, पेपरची कात्रणे, आपआपल्या कार्यकाळात केलेल्या समाजाभिमुख उपक्रमाची माहिती इतिहास लेखनासाठी उपलब्ध करुन द्यावी व फेस्कॉमचे विहित कार्य इतिहासाच्या रुपाने पुढील पिढीला कळावे यासाठी सहकार्य करावे.

**१४) समन्वय समित्या–**

प्रादेशिक विभाग (विभागीय मंडळे) आपल्या विभागात उत्तम संघटन व संपर्क यासाठी जिल्हा/शहर/तालुका पातळीवर ''समन्वय समित्या'' नियुक्त करु शकतील. त्या फेस्कॉमचा एक प्रशासकीय भाग असतील. फेस्कॉमचे अंगीकृत उद्दिष्ट प्रत ते कार्य त्या त्या समन्वय समित्यांचे कार्यक्षेत्रातील ज्येष्ठ नागरिक संघ व संघ सदस्यांचे मार्फत गाव पातळीपर्यंत पोहोचवतील. प्रादेशिक विभागांनी त्यांचे कार्यपध्दतीवर सहकार्य व मदत करावी. संघाच्या वार्षिक वर्गण्या जमा करणे, समाजाभिमुख कार्यक्रम राबविणे, दरवर्षी ३१ मार्चला वार्षिक हिशोब पूर्ण करणे व प्रादेशिक विभागाच्या अध्यक्षांना सादर करण्याचे काम समन्वय समितीचे अध्यक्ष/ सचिव व पदाधिकारी यांनी करावयाचे आहे.

सर्व प्रादेशिक विभागांनी कामाचे विकेंद्रीकरण होण्यासाठी समन्वय समित्यांचे गठण करावे.

**समारोप–**

फेस्कॉमच्या प्रशासकीय वाटचालीतील काही मुद्दे याठिकाणी मी दिले आहेत. फेस्कॉम ही सेवाभावी संघटना गेली ४१ वर्षे काम करत आली आहे. यापूर्वीचे पदाधिकारी यांनी तन-मन-धनाने संघटनेत काम करुन पाया मजबूत करुन ठेवला आहे. संघटनेत पदाधिकारी येतात-जातात पण संघटना कायम असते. त्यामुळे आपल्या आधी येऊन गेलेल्या पदाधिकारी यांनी केलेल्या कामाला पुढे-पुढे नेणे व या पुढे येणाऱ्या नव्या दमाच्या कार्यकर्त्यांपूढे, पदाधिकाऱ्यांच्या पुढे नवा वस्तुपाठ घालून ठेवणे हे आज आपले कर्तव्य आहे. त्यासाठी संघटनेत तळमळीचे कार्यकर्ते हवेत व त्यातूनच मग धडाडीचे पूर्तीसाठी सर्वसमावेशक कृती कार्यक्रमाचे माध्यमातून जास्तीत जास्त ज्येष्ठांपर्यंत पोहोचणे व त्यांचे उर्वरित आयुष्य सुखी-समाधानी, आरोग्यपूर्ण, निरामय व सन्मानाने जावे यासाठी आपण कार्यशील, प्रयत्नशील राहूया, हीच मनोकामना व्यक्त करुन माझा लेखणीला येथे विराम देतो.

* * *

# ''फेस्कॉम मनोयुवा कौन्सिलची वाटचाल व आनंद मेळावे''

सौ. स्वाती गुळवणी
उपसंपादिका

स्व. डॉ. राधाकृष्ण भट यांनी दि.१० सप्टेंबर १९७७ रोजी भारतातील पहिला ज्येष्ठ नागरिक संघ डोंबिवली येथे स्वतः ज्येष्ठ नागरिक नसतांनादेखील वयाच्या ३४व्या वर्षी गठीत केला. दि.१२ डिसेंबर १९८० रोजी महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघाची स्थापना करुन ज्येष्ठ नागरिक चळवळीस बळ देणेचा प्रयत्न केला. त्यांच्या आत्मिक बळ शक्तीवरच त्यांच्या बरोबरीने पदाधिकारी यांनी सदरची चळवळ महाराष्ट्रात फोफावण्याची किमया साधली. आज ४४ वर्षांनी शहरी व ग्रामीण भागात ज्येष्ठ नागरिक संघ कार्यरत असून ५०६ महिला संघांचा सहभाग कौतुकास्पद आहे.

ज्येष्ठ नागरिक चळवळीची तसेच त्यांचे उर्वरित आयुष्य आनंदमय, आरोग्यदायी व आर्थिकदृष्ट्या सक्षम करणेसाठीचे प्रयत्न, शासनाच्या विविध सवलींची माहिती राज्यातील प्रत्येक ज्येष्ठ नागरिकांपर्यंत पोहोचणेसाठी दि.१ मे १९९३ रोजी 'मनोयुवा' त्रैमासिकाची निर्मिती झाली. काही काळानंतर या त्रैमासिकेचे नाव 'मनोहारी मनोयुवा' करण्यात आले. सुरुवातीस त्रैमासिक स्वरुपात प्रकाशित होणारा हा अंक त्यानंतर द्वैमासिक स्वरुपात आणि २०१८ पासून मासिक स्वरुपात प्रकाशित होऊ लागला. राज्यात विविध जिल्ह्यातील पदाधिकारी यांनी याची जबाबदारी स्विकारुन मासिक लोकाभिमुख बनविणेचा प्रयत्न केला. मासिकाची लोकप्रियता वाढली. लेखक, कवी, स्फुट लेखक वगैरे चाहते लाभले. त्यंची संख्या वाढली. त्यांच्या संकल्पनेतून २००० साली ''आनंद मेळावा'' ही संकल्पना उदयास आली. नाशिकमधून सदर अंकाची छपाई, प्रकाशन व वितरण होत होते. नाशिक मधील मा.विद्याधर पाध्ये, य.ना. बेडेकर, प्रा. राम क्षीरसागर, कै. अनंत घोलप, कै. विजया बेडेकर यांच्या प्रयत्नातून सदर संकल्पनेस मूर्त स्वरुप देणेचा प्रयत्न झाला. आणि या प्रयत्नांचे सर्वत्र स्वागत होऊ लागले. विविध ठिकाणच्या आनंद मेळाव्यामुळे वर्गणीदार, वाचक संख्या आणि लेखन समृध्दीस सहकार्य करणाऱ्या हातांच्या संख्येत भर पडली. यानिमित्त विविध ठिकाणी संपन्न झालेल्या ''आनंद मेळाव्यांची'' यशोगाथा आपणासमोर ठेवत आहोत.

**सुरुवातीस ज्या ज्या ठिकाणी मनोहारी मनोयुवाचे आनंद मेळावे संपन्न झाले, त्या त्या ठिकाणच्या सर्वच पदाधिकारी यांचे सहकार्य लाभले. नाशिकचे श्री.विद्याधर पाध्ये यांच्या संकल्पनेमुळेच मनोहारी मनोयुवाचे झालेले आनंद मेळावे आपणासमोर सादर करत आहोत.**

**१) पहिला आनंद मेळावा–**

लोणावळ्या सारख्या निसर्ग सौंदर्याने नटलेल्या मनःशक्ती केंद्रात पहिला आनंद मेळावा दिनांक १ व २ डिसेंबर २००० रोजी संपन्न झाला. वाचकांच्या अपेक्षांचा विचार विनिमय झाला. यातील कार्यक्रमात विविध कवींनी आपल्या कविता सादर केल्या. नभोवाणी आणि दूरदर्शन कलाकार मोरेश्वर उगावकर यांच्या विविध अंगी गाण्यांनी आनंदोत्सव मेळावा कार्यक्रमात अधिकच रंगत आली.

**२) दुसरा आनंद मेळावा–**

दिनांक २६ जानेवारी २००२ रोजी जळगांव जिल्ह्यातील ''पाल'' या निसर्गरम्य गावी दुसरा आनंद मेळावा संपन्न झाला. माजी शिक्षणमंत्री मा.मधुकरराव चौधरी हे अध्यक्षस्थानी होते. शालेय विद्यार्थ्यांच्या विविधरंगी करमणुकीच्या कार्यक्रमाने आनंद मेळाव्याची शोभा वाढली.

### ३) तिसरा आनंद मेळावा–

दिनांक १८ व १९ जानेवारी २००३ रोजी औरंगाबाद येथे तिसरा आनंद मेळावा संपन्न झाला. थोर शिक्षणतज्ञ मा.वि.वि. चिपळुणकर आणि प्रसिध्द उद्योजिका सौ.मीनल मोहाडीकर यांची उपस्थिती आणि मार्गदर्शनामुळे आनंद मेळाव्यात चैतन्य निर्माण झाले. सौ.विनिता गर्दे व त्यांच्या महिला संघातील महिला कार्यकर्त्यांचा सक्रिय सहभाग कौतुकास्पद ठरला.

### ४) चौथा आनंद मेळावा–

दिनांक १ व २ नोव्हेंबर २००३ रोजी सातारा येथे चौथा आनंद मेळावा संपन्न झाला. फेस्कॉमचे अध्यक्ष मा.बाळासाहेब माजगांवकर यांचे अध्यक्षतेखाली व मा.मुकुंदराव किर्लोस्कर, प्रा.डॉ. यशवंत पाटणे, प्रा.राम क्षीरसागर आणि कौन्सिलचे अध्यक्ष मा.विद्याधर पाध्ये यांच्या उपस्थितीतील चौथा आनंद मेळावा बहारदार ठरला.

### ५) पाचवा आनंद मेळावा–

अलिबाग तालुकयाती ''रेवदंडा'' या सागर किनाऱ्यावरील नारळी-पोफळीच्या बागांनी वेढलेल्या छोटेखानी गावी दि.२६ व २७ मार्च २००५ रोजी पाचवा आनंद मेळावा साजरा झाला. कल्याणचे साहित्यिक व माजी शिक्षक आमदार मा.श्री. प्रभाकर संत व दैनिक लोकमत, मुंबईचे संपादक मा.श्री. मधुकर भावे हे प्रमुख पाहुणे होते. नाशिकच्या भगिनींचा मराठी भाषेच्या अभिमानाविषयीचा सांस्कृतिक कार्यक्रम कौतुकास आणि प्रशंसनेस पात्र ठरला. मेळाव्याचे नियोजन रेवदंड्यांचे उत्साही आणि कल्पक दाम्पत्य श्री.सुभाष चिटणीस व सौ.लताबाई चिटणीस यांनी केले.

### ६) सहावा आनंद मेळावा–

दि. १ व २ मे २००६ रोजी कृष्णामाईच्या तीरावर वसलेल्या व प्रसिध्द गणपती मंदिर असलेल्या वाई या तीर्थक्षेत्री सहावा आनंद मेळावा संपन्न झाला. हे तीर्थक्षेत्र म्हणजे वेदाध्ययनाच्या प्राचीन परंपरेमुळे ख्याती पावलेले ''ज्ञानतीर्थ''. वाईचे खासदार मा.लक्ष्मणराव पाटील हे उद्घाटक होते. सौ. घाटीकर यांचे जागेवा नृत्य व श्री.काशीकर यांचे बासरीवादन हा नाशिककरांनी सादर केलेला वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक कार्यक्रम ठरला. सौ.वसुधा पाध्ये यांनी या मेळाव्यात प्रथमच ''साहित्यवरील प्रश्नमंजुषा'' हा अभिनव कार्यक्रम सादर करुन प्रेक्षकांची मने जिंकली.

### ७) सातवा आनंद मेळावा–

दिनांक २७ व २८ फेब्रुवारी २००७ रोजी विदर्भातील ''अकोला'' येथे सातवा आनंद मेळावा संपन्न झाला. नाईकांकडे कीर्तन महाविद्यालयाच्या आनंद गीताने आनंद प्रारंभ झाला. नागपूर जवळच्या रामटेक येथील महाकवी कालीदास संस्कृत महाविद्यालाचे कुलगुरु मा. डॉ. पंकज चांदे हे उद्घाटक व प्रमुख पाहुणे होते. सांस्कृतिक कार्यक्रमात श्री.दादा रत्नपारखींचे उपहासात्मक विनोदाचा आश्रय घेत केलेले ''गणू कास्तकाराचे मनोगत'' क्षणात हसू तर क्षणात आसू आणत होते. डॉ. नानासाहेब चौधरी यांचे ''आनंदी वृध्दत्व'' मनोगत वैचारिक होते.

### ८) आठवा आनंद मेळावा–

दिनांक ४ व ५ मे २००८ रोजी नववा आनंद मेळावा दक्षिण महाराष्ट्रातील इतिहास प्रसिध्द ''सांगली'' येथे संपन्न झाला. डॉ. गो.रा. कुलकर्णी हे उद्घाटक व प्रमुख पाहुणे होते. कोल्हापूर प्रादेशिक विभागाचे अध्यक्ष मा.श्री. माधवदास शेडजी यांची प्रमुख उपस्थिती होती. सांगलीच्या गुरुकृपा भजनी मंडळाचा भजनाचा कार्यक्रम व डॉ.गुरुनाथ कुलकर्णी यांच्या मराठी-हिंदी गीतगायन कार्यक्रमामुळे आनंद

मेळाव्याची शोभा वाढली. या प्रसंगी श्री.रा.पां. जोशी (संस्कृत अध्यापक-वेंगुर्ले), रवी कुलकर्णी व कवी गिरीबाल (कृ.त्र्यं. हवालदार) यांचेही कार्यक्रम बहारदार झाले. कार्यक्रमाचेअध्यक्ष प्रसिध्द साहित्यिक व अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष मा.प्रा. म.द. हातकणंगलेकर यांचे मार्गदर्शनीय विचार मोलाचे होते. कार्यक्रमाचे नियोजन स्वामी विवेकानंद ज्येष्ठ नागरिक संघाचे सदस्य श्री.शांतीलालजी बाफना यांनी केले.

**९) नववा आनंद मेळावा–**

दिनांक २४ व २५ ऑक्टोबर २००९ रोजी कोकण किनारपट्टीवर समुद्र सानिध्य आणि अलौकीक निसर्गरम्यता लाभलेल्या ''वेंगुर्ला'' येथे नववा आनंद मेळावा संपन्न झाला. सदरचा आनंद मेळावा महासंधाचे तत्कालीन अध्यक्ष मा.श्री.अनंतराव घोलप यांचे अध्यक्षतेखाली आणि वेंगुर्ल्याचे नगराध्यक्ष मा.श्री. संदेशजी निकम यांचे प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. मनोयुवा कौनिस्लचे अध्यक्ष मा. श्री.विद्याधर पाध्ये, महासंघाचे सचिव मा.श्री. अनिल कासखेडीकर, कोकणचे साहित्यिक श्री. हरिहर आठलेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

आठव्या मेळाव्यापासून नवव्या मेळाव्यापर्यंतच्या कालावधीत ''मनोहारी मनोयुवा'' मध्ये प्रसिध्द झालेल्या उत्कृष्ट गद्य, पद्य साहित्यासाठी प्रत्येकी चार-चार क्रमांकाना ''मनोयुवा गद्य-पद्य पुरस्कार'' देणेत आले.

आनंद मेळाव्याच्या पहिल्या रात्री ''इंद्रसेनाची सत्वपरिक्षा'' हे दशावतारी नाटक सादर करण्यात आले. नाशिकच्या स्नेहवर्धिनी महिला मंडळाच्या महिलांनी ''जलदिंडी-जलसाक्षरता'' रुपक जलदिंडीच्या स्वरुपात सादर केले. प्रा. चंद्रकांत अडावदकर आणि प्रा. म.ग. कुलकर्णी यांचे अध्यक्षतेखाली ''वृध्दांचे एकटेपण'' हा परिसंवाद संपन्न झाला. विविध गुणसंपन्न कार्यक्रमाचे नियोजनाने आनंद मेळाव्याची शोभा वाढली.

**१०) दहावा आनंद मेळावा–**

दिनांक ३० व ३१ जुलै २०१० रोजी दहावा आनंद मेळावा ''सोलापूर'' येथे संपन्न झाला. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी महासंघाचे अध्यक्ष मा.श्री. अनंतराव घोलप होते. उद्घाटन सोलापूर महानगरपालिकेचे महापौर मा.श्री. आरिफभाई शेख यांनी केले. आमदार मा.श्री. दिलीप माने यांनी मार्गदर्शन केले. आनंद मेळाव्यास मनोयुवा कौन्सिलचे माजी अध्यक्ष मा.श्री. विद्याधर पाध्ये, संपादिका प्रा. कुंदबाला खांडेकर, माजी संपादक राम क्षीरसागर, नगरसेविका सौ.अस्मिता गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

पहिल्या दिवशी रात्री महिलांचे गरबा नृत्य, पर्यावरण नाटिका, भावगीत, एकांकिका, कविता वाचन तसेच जादूगार इंद्रजीत यांचे जादूचे प्रयोग आदि कार्यक्रम सादर झाले. दुसऱ्या दिवशी ''एकाकी जीवन'' या विषयावर परिसंवाद, प्रश्नमंजुषा, काव्य वाचन आणि ''सांगायचंय'' या मुक्त विचारधारांच्या कार्यक्रमाने आनंद मेळाव्याची शोभा वाढली.

**११) अकरावा आनंद मेळावा–**

दिनांक २७/०६/२०१६ रोजी ''फलटण'', जिल्हा सातारा येथील अनंत मंगल कार्यालयात अकरावा आनंद मेळावा साजरा करण्यात आला. मेळाव्याचे उद्घाटक विधान परिषदेचे सभापती मा.ना. श्रीमंत रामराजे नाईक-निंबाळकर हे होते. स्वागताध्यक्ष मा. श्रीमंत संजीवराजे नाईक-निंबाळकर तर आनंद मेळाव्याचे अध्यक्षपद फेस्कॉमचे अध्यक्ष मा. श्री. द.तु. चौधरी यांनी भूषविले. सदर आनंद मेळाव्यात आमदार दिपक चव्हाण, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष माणिकराव सोनवलकर, फलटण पंचायत समितीच्या सभापती मा.सौ. वैशाली गावडे, मनोहारी मनोयुवाचे संपादक य.ना.कदम हे प्रमुख पाहुण म्हणून उपस्थित होते. आईस्कॉनचे आजीवन अध्यक्ष मा.डॉ.

शं.पां. किंजवडेकर, आईस्कॉनचे अध्यक्ष डी.एन. चापके, फेस्कॉमचे उपाध्यक्ष आण्णासाहेब टेकाळे, मुख्य सचिव अरुण रोडे, उपाध्यक्ष ना.ना. इंगळे तसेच फेस्कॉमचे इतर पदाधिकारी उपस्थित होते.

या आनंद मेळाव्याचे संयोजक फेस्कॉम प्रादेशिक विभाग, पुणे आणि प्रायोजक फलटण तालुका ज्येष्ठ नागरिक संघाची समन्वय समिती ही होती.

**१२) बारावा आनंद मेळावा-**

दिनांक १२ व १३ मे २०१७ रोजी ऐतिहासिक वारसा लाभलेल्या ''करवीर नगरीतील कोल्हापूर'' राजर्षी शाहू स्मारक भवन येथे बारावा आनंद मेळावा संपन्न झाला. मेळाव्याचे उद्‌घाटन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु मा. श्री.देवानंद शिंदे यांच्या हस्ते झाले. मनोहारी मनोयुवाच्या रौप्य महोत्सवी वर्षात पदार्पणानिमित्त विशेषांकाचे प्रकाशन फेस्कॉमचे अध्यक्ष मा.श्री. दत्तात्रय चौधरी यांच्या हस्ते या मेळाव्यात करण्यात आले. फेस्कॉमचे तत्कालीन अध्यक्ष मा.श्री. अनंतराव घोलप, आयस्कॉनचे अध्यक्ष मा.श्री. दि.ना. चापके, मनोहारी मनोयुवा कौन्सिलचे अध्यक्ष मा.प्रा.एस.डी. साळुंखे, संपादक प्रा.य.ना. कदम यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. दोन दिवसांच्या मेळाव्यात कोल्हापूरचे मानसोपचार तज्ञ डॉ. पी.एम.चौगुले, ख्यातनाम योगतज्ञ डॉ.धनंजय गुंडे, जिल्हा परिषदेचे अति.मुख्य कार्यकारी अधिकारी मा.श्री. इंद्रजित देशमुख, कवी मा.श्री. विसुभाऊ बापट आदि मान्यवरांच्या मार्गदर्शनाचा विविध सत्रात लाभ घेणेत आला. भावगीत, भक्तीगीत, बासरी वादन, कथ्थक नृत्य आदि सांस्कृतिक कार्यक्रमांबरोबरच मनोहारी मनोयुवा वरील काव्य आणि ''लाडक्या निरोप मिळाला'' ही लघु नाटिका सादर करण्यात आली.

**१३) तेरावा आनंद मेळावा-**

मनोहारी मनोयुवा १३वा आनंद मेळावा आणि फेस्कॉमचा ३९वा वर्धापन दिन अकोला येथील भ्रातृ मंडळ सभागृहात दि.३१/१२/२०१८ रोजी संपन्न झाला. कार्यक्रमाचे उद्‌घाटक गृहमंत्री तथा पालकमंत्री मा. श्री.रणजीत पाटील हे होते. फेस्कॉमचे अध्यक्ष अरुण रोडे अध्यक्षस्थानी होते. गृहमंत्री मा. रणजीत पाटील यांच्या हस्ते पुस्तकाचे आणि२०१९ च्या कॅलेंडरचे प्रकाशन यावेळी करण्यात आले. मा.ना.ना. इंगळे यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त गृहमंत्री रणजीत पाटील यांच्या हस्ते त्यांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

मा. डॉ. नानासाहेब चौधरी यांनी आहार-विहार आणि आरोग्य याविषयी मार्गदर्शन केले. मा.श्री. राम नेमाडे, माजी अध्यक्ष श्री. द. तु. चौधरी, आयस्कॉनचे महासचिव अनिल कासखेडीकर, फेस्कॉमचे अध्यक्ष अरुण रोडे यांनी मार्गदर्शन केले.

आनंद मेळावा आणि वर्धापन दिनानिमित्त उपाध्यक्ष विजय औंधे, मुख्य सचिव अभि. अरविंद कुलकर्णी, अतिरिक्त सचिव विनायक पांडे, कोषाध्यक्ष चंद्रकांत साळवेकर, अतिरिक्त कोषाध्यक्ष आण्णासाहेब दानोळे, संपर्क सचिव डी.के. पाटील, संघटक सचिव उत्तमराव तांबे, प्रा. तेज निवळीकर, पुणे प्रादेशिक विभागाचे अध्यक्ष चंद्रकांत महामुनी, मनोहारीचे संपादक अशोक सकळकळे आणि कार्यकारी मंडळातील सदस्य, ज्येष्ठ नागरिक समन्वय समित्यांचे जिल्हा/तालुका अध्यक्ष आणि त्यांचे पदाधिकारी, इंगळे परिवार आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मनोयुवाचे उपसंपादक श्री.तुळशीरामजी बोबडे यांनी आभार प्रदर्शन केले.

**१४) चौदावा आनंद मेळावा-**

चौदावा आनंद मेळावा मिरज तालुक्यातील जिल्हा (जिल्हा सांगली) ''आरग'' या गावी दि.१६ फेब्रुवारी २०२१ रोजी संपन्न झाला. सांगली जिल्ह्यात

मनोहारी मनोयुवा अंकाचे प्रकाशनापूर्वीच फेस्कॉमचे अध्यक्ष मा.अरुण रोडे यांनी सूचित केलेनुसार प्रामुख्याने आरग सारख्या ग्रामीण भागात मोठ्या दिमाखात आनंद मेळावा संपन्न झाला. ग्रामीण भागातील आनंद मेळाव्यात ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली.

सदर कार्यक्रमाचे संयोजक कोल्हापूर प्रादेशिक विभाग हे होते. दूध व्यावसायिक श्री.दत्तात्रय शिंदे हे आयोजक होते. कार्यक्रमास फेस्कॉमचे अध्यक्ष श्री.अरुण रोडे, उपाध्यक्ष श्री.आण्णासाहेब टेकाळे, मुख्य सचिव अभि.अरविंद कुलकर्णी, अतिरिक्त कोषाध्यक्ष आण्णासाहेब दानोळे, पुणे प्रादेशिक विभागचे अध्यक्ष चंद्रकांत महामुनी, सचिव हणमंत कुंभार, दक्षिण मराठवाडा प्रादेशिक विभागाचे अध्यक्ष डॉ.बी.आर. पाटील,कोल्हापूर प्रादेशिक विभागाचे अध्यक्ष श्री.पी.के. माने, सचिव अंजुमन खान, प्रसिध्द नेत्रतज्ञ डॉ. अनिल कुलकर्णी, कोल्हापूर, सांगली जिलह्याचे अध्यक्ष, तालुका समित्यांचे अध्यक्ष, पदाधिकारी, आरग व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष, पदाधिकारी, आरग, बेडग, ग्रामपंचायतीचे सरपंच व सदस्य, प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. चिकुर्डेकर व त्यांचा कर्मचारी वर्ग तसेच ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## या आनंद मेळाव्यात पुढीलप्रमाणे कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

* उपस्थित सर्व १३०० ज्येष्ठ नागरिकांचा शाल व श्रीफळ देऊ सत्कार.

* उपस्थित सर्व १३०० ज्येष्ठ नागरिक यांना सुग्रास भोजन (तुपातील शिरा)

* ५ ज्येष्ठ नागरिक/ पदाधिकारी यांचा स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र, शाल व श्रीफळ देऊन सन्मान.

* आरग प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय आधिकारी, कर्मचारी, परिचारिका, आशा वर्कर्स अशा एकूण ३५ जणांचा ''कोरोना योध्दा प्रशस्तीपत्र'', शाल व श्रीफळ देऊन सत्कार.

* नेत्रशल्य चिकित्सक डॉ. अनिल कुलकर्णी यांचे नेत्रविषयक आजार व काळजी याबाबत मार्गदर्शन.

* सूत्रसंचालन माध्यमिक शिक्षक व सामाजिक कार्यकर्ते यांचे वतीने.

* कार्यालय, भोजन, शाल, श्रीफळ, आदिचा सर्व खर्च श्री. दत्तात्रय शिंदे (दुग्ध व्यवसायिक) यांचा.

* कार्यालयातील सर्व कामकाजात, खुर्च्या ठेवणे-उचलणे सह संपूर्ण कार्यक्रमात श्री.दत्तात्रय शिंदे, त्यांच्या सुविद्य पत्नी सौ.सुवर्णा दत्तात्रय शिंदे आणि चिरंजीव देवराज दत्तात्रय शिंदे यांचा मोठा हातभार.

## श्री दत्तात्रय शिंदे यांचा उद्देश

**प्रत्येक ज्येष्ठांची त्यांच्या मुलांनी, सुनांनी, नात-नातवांनी काळजी घ्यावी. प्रत्येक ज्येष्ठांच्या चेहऱ्यावर मला सतत हास्य पहावयाचे आहे.**

फेस्कॉम मनोयुवा कौन्सिलच्या प्रामुख्याने नाशिकच्या विचारवंताचे प्रेरणेने सुरु झालेल्या आनंद मेळाव्याची संकल्पना प्रतयेक मेळाव्यात आनंद देऊनच गेली. प्रत्येक आनंद मेळाव्याचे प्रत्येक ठिकाणी वैशिष्ट आणि वेगळेपण जाणवत होते. ''मनोहारी आनंद मेळावा'' विचारवंतांचे सहकार्याने प्रत्येक जिल्ह्यात व्हावा. त्याप्रसंगी त्या त्या जिल्ह्याकरिता, ज्येष्ठ नागरिक संघांचे कार्यक्रमाबरोबरच जिल्ह्याचा गौरव वाढविणारे लेखाद्वारे, मनोहारी मनोयुवा अंकाने शोभा वाढवावी हीच अपेक्षा या क्षणी व्यक्त करावीशी वाटते.

***

# "राज्याच्या ज्येष्ठ नागरिक धोरणाची अंमलबजावणी स्थानिक स्वराज्य संस्थांची जबाबदारी"

श्रीमती चेलनादेवी खुरपे
सदस्या, फेस्कॉम प्रादेशिक विभाग, सांगली.
मो. ९४०४२७१८२२

राज्याच्या सर्वसमावेशक ज्येष्ठ नागरिक धोरण २०१३च्या अंमलबजावणीबाबत शासनाने शासन निर्णय क्र.ज्येष्ठना २०१६/प्र.क्र.७१/सामासु, दिनांक ९ जुलै २०१८ अन्वये आदेशित केले आहे. राष्ट्रीय धोरणाअंतर्गत शासनाने प्रामुख्याने ज्येष्ठ नागरिकांसाठी आर्थिक नियोजन करणे, ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणे आणि त्यांना ताणतणावास तोंड देण्यासाठी सक्षम करणे याविषयी कार्यवाही करणेबाबत विविध विभागांना आदेशित केले आहे. या धोरणाअंतर्गत बऱ्याच विभागांवर जबाबदाऱ्या सोपविलेल्या आहेत.

आपल्या मासिकातून विविध विभागावर टाकलेली जबाबदारी व यातून ज्येष्ठ नागरिकांच्या अपेक्षा यांचा उहापोह केला जाणार आहे. ज्येष्ठ नागरिक चळवळीतील पदाधिकारी यांच्यापेक्षा ग्रामीण भागातील ज्येष्ठांपर्यंत ज्येष्ठ नागरिक धोरणाबाबत माहिती पोहचविणे आणि त्यांना सजग करणे हा प्रमुख उद्देश आहे. ज्येष्ठ नागरिक पदाधिकारी यांचेबरोबरच शहरी व ग्रामीण भागातील ज्येष्ठ नागरिकांनी धोरणाच्या अंमलबजावणीसाठी प्रयत्न करणे अभिप्रेत आहे.

ज्येष्ठ नागरिक धोरणाअंतर्गत जबाबदारी टाकलेल्या विभागांचा अभ्यास करतांना नगरपंचायती, नगरपरिषद, नगरपालिका अभ्यास करताना नगरपंचायती, नगरपरिषद, नगरपालिका आणि महानगरपालिका या विभागापासून माहिती घेणेचा प्रयत्न करुया.

दि. ०९/०७/२०१८ च्या शासन निर्णयानुसार आणि नगर विकास विभागाच्या शासन परिपत्रक क्र.ज्येनाधो-२०१८/प्र.क्र.९६/नवि-२८, दि.०१/११/२०१८ अन्वये ज्येष्ठ नागरिक धोरण सक्षमपणे राबविणेसाठी प्रत्येक महानगरपालिकेने एक उप आयुक्त/ सहाय्यक आयुक्त यांचेवर जबाबदारी सोपवावी. नगरपालिका/ नगरपरिषद/ नगरपंचायतीत ही जबाबदारी मुख्याधिकारी यांची राहील असे आदेशित केले आहे. महानगरपालिकेने जबाबदारी सोपविलेल्या अधिकाऱ्याची माहिती शासनास कळवावी, असे स्पष्ट केले आहे. याबाबतीत फेस्कॉमने शहर अध्यक्ष आणि पदाधिकारी यांनी महानगरपालिकेशी संपर्कात राहणे आवश्यक आहे.

महानगरपालिकेने जबाबदारी सोपविलेल्या अधिकाऱ्याची माहिती फेस्कॉमला कळविणे महत्त्वाचे आहे. ज्या महानगरपालिकेने याप्रमाणे कार्यवाही केली नाही, त्या महानगरपालिकेसंदर्भात फेस्कॉम नगरविकास खात्याचा पाठपुरावा करु शकेल. आयुक्त तथा संचालक नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांनी दर दोन महिन्यांनी धोरण आढावा घ्यावा, अशा सूचना आहेत. आयुक्त ज्येष्ठ नागरिकांचे प्रश्न सोडवितात का? हे पदाधिकारी यांनी पाहिले पाहिजे.

या खेरीज स्थानिक स्वराज्य प्रशासनाकडून धोरण अंमलबजावणी अंतर्गत खालील कामकाज पूर्ण होणे अपेक्षित आहे.

१) स्थानिक स्वराज्य संस्थेने प्रशासनात वृध्दांच्या

अनुभवाचा व ज्ञानाचा फायदा घ्यावा.

२) स्थानिक स्वराज्य संस्थेत ज्येष्ठ नागरिक संघाना कार्यक्रमासाठी जागा उपलब्ध करुन द्यावी.

३) ज्येष्ठ नागरिकांसाठी करमणूक केंद्र, ज्येष्ठ नागरिक केंद्र (विरंगुळा केंद्र) यासाठी जागा/ इमारत उपलब्ध करुन द्यावी.

४) गृह निर्माण सहकारी संस्थांचे आराखडे मंजूर करतांना विरंगुळा केंद्राची अट घालावी.

५) उद्यानात अथवा पदपथावर बाकांची सोय करावी.

६) उद्यानात व्हिलचेअर नेण्याची सोय करावी.

७) शहरी सार्वजनिक बसमध्ये सुलभरितीने चढण्यासाठी सोय करावी.

८) अपंगांसाठी आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वच्छतागृहाची सोय करावी. स्वच्छता गृहात न घसरणाऱ्या फरशा, पकडदांडा असाव्यात.

९) ज्येष्ठ नागरिकांना आयकर तसेच प्रवासाप्रमाणेच स्थानिक स्वराज्य प्रशासनाकडून आकारण्यात येणाऱ्या करामध्ये सवलत द्यावी. (घरपट्टी/पाणीपट्टी/ दिवा पट्टी वगैरे)

१०) प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेत वृध्दाश्रमासाठी जागा राखून ठेवावी.

११) विविध निवासी/ अनिवासी संकुलात वृध्दाश्रम/ विरंगुळा केंद्र उभारण्याचा प्रयत्न करावा.

१२) सर्व निवासी, वाणिज्य व इतर संकुले यामध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी सोयी सुविधांची तरतूद करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे आखून द्यावीत. तसेच यासाठी विकास नियंत्रण नियमावली (D.C.R.) यामध्ये आवश्यक ते बदल करावेत.

शासनाने ज्येष्ठ नागरिक धोरण अंतर्गत ज्येष्ठ नागरिकांच्या सुखसोयीसाठी शासन निर्णय अंतर्गत आदेशित केले असून परिपत्रक द्वारा सूचनादेखील दिल्या आहेत. शासन शासनस्तरावर प्रयत्न करीत आहे. परंतु जिल्हा/तालुका/ शहर पातळीवर ज्येष्ठ नागरिकांसाठी काम करण्याची स्थानिक पातळीवर प्रशासनाची मानसिकता बदलण्यासाठी फेस्कॉम प्रतिनिधी सजग झाला पाहिजे. तसेच प्रत्येक ज्येष्ठ नागरिक देखील अभ्यासू होऊन त्याने प्रशासनाला जागे करण्याची गरज आज निर्माण झाली आहे.

याबाबत मुद्दाम उल्लेख करावासा वाटतो सोलापूर जिल्ह्यातील सांगोला नगरपालिका हद्दीतील महिला ज्येष्ठ नागरिक संघाचा. येथील महिला संघानी आपल्या कार्यशैलीचा जोरावर नगरपालिका प्रशासनाकडून नगरपालिकेला प्राप्त होणाऱ्या अनुदानापैकी तीन टक्के अनुदान ज्येष्ठ नागरिकांच्या सुखसोयीसाठी खर्च करणेबाबतचा ठराव मान्य करुन घेतला आहे.

ज्येष्ठ नागरिक हो जागे व्हा आणि शासनाने देऊ केलेल्या सुखसुविधा स्थानिक प्रशासनाकडून मिळवण्यासाठी प्रयत्न करा.

प्रत्येक ज्येष्ठ नागरिकाचा उर्वरित भविष्यकाळ आनंदमय, आरोग्यदायी व तणावमुक्त जावा हीच फेस्कॉमची तीव्र इच्छा आहे.

***

श्री. अरुण माधव रोडे
अध्यक्ष, फेस्कॉम महाराष्ट्र,पुणे
मो.नं. ९८५०८८४३७५

## ''फेस्कॉम डिजिटल अकॅडमीची निर्मिती''

फेस्कॉम डिजिटल अकॅडमीच्या उद्‌घाटन सोहळ्यात सर्व उपस्थित मान्यवरांचे मनःपुर्वक स्वागत ! आज चैत्र शुध्द प्रतिपदा ! गुढीपाडवा !!

शालीवाहन शके १९४३ ला प्रारंभ

प्लव नाम संवत्सर प्लव म्हणजे नौका....!

गतवर्षी शार्वरी नाम संवत्सर होते. शार्वरी म्हणजे अंधार, काळोख. याचा अनुभव आपण जानेवारी २०२० पासूनच घेत आलेलो आहोत. पण आता आज गुढीपाडवा ! नववर्षाचा प्लव संवत्सरात प्लव म्हणजे या नौकेतून हा भवसागर आपण सुरक्षितपणे पार पाडू याबाबत जगानियंत्याकडे प्रार्थना करुया !

आणि या शुभमुहुर्तावर आज फेस्कॉम महाराष्ट्रातील ज्येष्ठ नागरिकांना एका नव्या 'डिजिटल युगात' घेऊन जात आहे.

'फेस्कॉम डिजिटल अकॅडमीची' विधीवत स्थापना होत आहे आणि तीही विद्यानगरी, विद्येचे माहेरघर असलेल्या पुण्यनगरीतील महाराष्ट्रातच नव्हे तर साऱ्या हिंदुस्थानात नामांकित असलेल्या 'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे' कुलगुरु माननीय प्रा.नितिनजी करमळकर यांचे करकमलाद्वारे !

याचबरोबर सावित्रीबाई फुले विद्यापीइाचे बहिःशाल शिक्षण मंडळ व ज्येष्ठ नागरिक सहाय्यता कक्षाचे मानद संचालक डॉ.धनंजय लोखंडे सर व याच कक्षाचे पहिले व माजी मानद संचालक व आताचे फेस्कॉमचे 'संशोधन, नियोजन, विकास व ज्ञानविस्तार' कक्षाचे अध्यक्ष माननीय प्रा.तेज निवळीकर सर तसेच आईस्कॉनचे माजी अध्यक्ष व आमचे नेते मा.आर.एन. मित्तल यांचे उपस्थितीत तसेच फेस्कॉमचे उपाध्यक्ष श्री.आण्णासाहेब टेकाळे मुख्यालय उपाध्यक्ष श्री.विजय औंधे, ज्येष्ठ नागरिक भवन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष श्री.ना.ना. इंगळे, मुख्य सचिव श्री.अरविंद कुलकर्णी, मनोयुवा मासिकाचे अध्यक्ष अंजुमन रशिद खान, फेस्कॉम मुख्यालयातील सर्व पदाधिकारी प्रादेशिक विभागांचे अध्यक्ष/ सचिव व पदाधिकारी आणि फेस्कॉम नेटवर्क समितीचे अध्यक्ष श्री.अविनाश लकारे, प्रसिध्द प्रमुख श्री.चंद्रकांत महामुनी यांचे अथक परिश्रमानेच हा सोहळा आज संपन्न होत आहे. मंगलदिन उदयाला आला आहे.

मित्रांनो, गेल्या मार्च २०२० पासून कोविड १९ /कोरोना महामारीने थैमान घातले आहे. सर्व जग बंदिवासात आहे. जगरहाटी बंद पडली आहे. जगातील अर्थ व्यवहार ढप्प झाले आहेत. या परिस्थितीत ज्येष्ठांची प्रतिकार शक्ती कमी म्हणून ते कोरोनाबाधीत होतात म्हणूनच घरात बसून आहेत. त्यामुळे गेले वर्षभर एकत्र येणे नाही, प्रवास नाही, सभा, संमेलने अगर कार्यक्रम होऊ शकले नाहीत. ''Work from Home'' चालू केले व फेस्कॉम संघटनेचे काम बंद न करता व्यवस्थित चालू ठेवले आहे.

मग यातूनच ऑनलाईन वेबिनार वर कार्यक्रमाची कल्पना फेस्कॉमचे नेटवर्क अध्यक्ष श्री.अविनाश लकारे यांनी मूर्त स्वरुपात आणली व लॉकडाऊन काळात २४चे वर वेबिनार घेतले गेले. मग यातूनच 'फेस्कॉम डिजिटल अकॅडमीची' कल्पना पुढे आली. दि.२१ डिसेंबर २०२० रोजीचे नियामक मंडळ सभेत रितसर ठरावाद्वारे 'फेस्कॉम डिजिटल अकॅडमीची' मंजुरी सर्व नियामक मंडळ

पदाधिकाऱ्यांनी एकमुखाने दिली. या शुभ मुहुर्तावर हा उद्‌घाटन सोहळा संपन्न होत आहे.

पुणे विद्यापीठ हे भारतातले पहिले विद्यापीठ ज्याने मे २००८ मध्ये 'ज्येष्ठ नागरिक सहाय्यता कक्ष' स्थापन केला त्यावेळी पुणे विद्यापिठाचे कुलगुरु होते, डॉ. नरेंद्र जाधव सर व या कक्षाचे पहिले मानद संचालक होते, प्रा.तेज निवळीकर. सन २००८ मध्ये मी पुण्याच्या 'अॅस्कॉप' या संघटनेत 'अकॅडमी डायरेक्टर' प्रबोधिनी संचालक होते. ज्येष्ठ नागरिक सहाय्यता कक्षामार्फत प्रबोधनात्मक काम ज्येष्ठ नागरिक संघटनेने चालू केले. २००९ नंतर मी फेस्कॉम पुणे प्रादेशिक विभागाचा अध्यक्ष झालो व ज्येष्ठ नागरिक सहाय्यता कक्षाचे मानद संचालक प्रा. तेज निवळीकर यांचे सहयोगाने पुणे, नगर नाशिक या जिल्ह्यात ज्येष्ठांसाठी कार्यशाळा आयोजित केल्या. ७२ कार्यशाळेतून ज्येष्ठांना केंद्र व राज्य सरकारचे धोरण, आर्थिक लाभाच्या योजना, ज्येष्ठांसाठी उपयुक्त कायदे, त्याचबरोबर ज्येष्ठ नागरिक संघ व ज्येष्ठ नागरिकांना क्रियाशील बनविणे 'Active Aging' व त्यांच्यामधील सप्तगुणांना वाव देणारे उपक्रम चालू केले. ज्येष्ठांचे कवि संमेलने, ज्येष्ठांनी साहित्य संमेलने, निबंध स्पर्धा, गटवार चर्चा, नियतकालिकांच्या स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन केले.

थोडक्यात काय तर पुणे विद्यापिठाच्या परिस स्पर्शाने ज्येष्ठ नागरिक चळवळीने कात टाकली व समाजभिमूख कामे होती घेतली. ज्येष्ठांकडील, ज्ञान, अनुभव, परिपक्वता व उपलब्ध वेळेचा सदूउपयोग हा कुटुंबासाठी, समाजासाठी, देशासाठी होऊ लागला.

पुणे विद्यापिठातून निवृत्तीनंतर प्रा. तेज निवळीकर यांची ज्येष्ठांप्रती जुळलेली नाळ विचारात घेता ते फेस्कॉमच्या नियोजन संशोधन व ज्ञानविस्तार समितीचे अध्यक्ष झाले व फेस्कॉमचे संस्थापक अध्यक्ष डॉ.राधाकृष्ण भट यांचे नावे महाराष्ट्रात व्याख्यानमाला चालू केली.

त्यानंतर ज्येष्ठ नागरिक सहाय्यता कक्षाचे मानद संचालक डॉ.नवनाथ तुपे व आता डॉ.धनंजय लोखंडे यांनी हे कार्य जोमाने पुढे चालविले आहे व आजवर डिजिटल अकॅडमी स्थापनेने फेस्कॉम व ज्येष्ठ नागरिक सहाय्यता कक्षाची मान उंचावली गेली आहे.

पुणे विद्यापिठाच्या ''बहिःशाल शिक्षण मंडळ'' व ज्येष्ठ नागरिक सहाय्यता कक्षाचा मी २०१५ पासून सदस्य म्हणून ही काम पहात आहे.


आज पुणे विद्यापीठाच्या परिस स्पर्शाने महाराष्ट्रातील ज्येष्ठ नागरिक डिजिटल युगात प्रवेश करीत आहे. हा 'दुग्ध शर्करा योग' आहे. फेस्कॉम तर्फे हे शिवधनुष्य नेटवर्कचे अध्यक्ष श्री.अविनाश लकारे व प्रसिध्द प्रमुख श्री.चंद्रकांत महामुनी यांनी सर्व प्रादेशिक विभागांचे अध्यक्ष, सचिव यांचे सहकार्याने उचललेले आहे. फेस्कॉमच्या सर्व पदाधिकारी यांनी याला साथ दिली आहे.

कुलगुरु मा. नितिनजी करमळकर यांनी ज्येष्ठांच्या प्रश्नांना नेहमीच प्राधान्य दिले आहे व त्याचे मार्गदर्शन सतत मिळत गेले आहे. त्यामुळेच या उपक्रमांना चालना मिळाली आहे. फेस्कॉमच्या ४० वर्षांच्या वाटचालीतील इतिहासात हा सोहळा सुवर्णाक्षरांनी लिहिला जाईल यात शंकाच नाही.


या सोहळ्यास उपस्थित सर्व मान्यवरांचे मी स्वागत करतो व येथेच थांबतो. जयहिंद ! जय महाराष्ट्र ! जय ज्येष्ठ शक्ती ! जय नारीशक्ती !

***

## फेस्कॉमला रु. १०००/- भरून झालेले सहयोगी सभासद...... अभिनंदन !



श्री. आण्णासाहेब टेकाळे
उपाध्यक्ष




श्री. अंजुमन खान
उपाध्यक्ष व प्रमुख



श्रीमती चेलनादेवी खुरपे
संपादिका



श्री. मोहन कांबळे
सचिव



श्री. अब्दुललतीफ शेख
रा. मिरज



श्री. वसंतराव थोरात
रा. कोल्हापूर



श्री. पांडुरंग मोरे
रा. रुकडी



महिला प्रशिक्षण शिबीरातील उपस्थित महिला पदाधिकारी अध्यक्ष अरूण रोडे, ज्येष्ठ नागरिक भवनचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, मुख्य सचिव यांचे समवेत



मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी निघालेले नागनाथ ज्येष्ठ नागरिक संघ पाटस चे ज्येष्ठ नागरिक.



फेस्कॉम च्या वर्धापन दिन कार्यक्रमात कोल्हापूर प्रादेशिक विभागाचे अध्यक्ष दिलीप पेटकर यांचा फेस्कॉमला देणगी दिलेबद्दल व आश्रयदाता सभासद झालेबद्दल सत्कार.




करवीर साहित्य परिषद यांचे वतीने साहित्य क्षेत्रातील योगदानाबद्दल जिल्हाधिकारी राहूल रेखावार यांच्या हस्ते सन्मानपत्र स्वीकारताना श्री. मोहन पुजारी



पलूस येथील मराठी ग्रामीण साहित्य संमेलनात प्रमुख वक्ता म्हणून विचार व्यक्त करताना श्री. अरुण रोडे.



रेड क्रॅास सोसायटीचे वतीने बेस्ट सचिव पुरस्कार राज्यपाल मा. कोश्यारीजी यांचे हस्ते स्विकारतांना जवाहरनगर (भंडारा) येथील संघाचे अध्यक्ष डॉ.गुप्ता.



ज्येष्ठ नागरिक ओळखपत्रे निवासी नायब तहसीलदार श्री.श्रीधर राजमाने आणि महसूल नायब तहसीलदार श्री.रविंद्र तोडकर यांचे हस्ते स्विकारताना आधार ज्येष्ठ नागरिक संस्थेचे अध्यक्ष अंजुमन खान आणि उपाध्यक्ष काशिनाथ काळे.



फेस्कॉम वर्धापन दिनाचे कार्यक्रमात मनोहारी मनोयुवा मासिकाच्या डिसेंबर २२ च्या अंकाचे प्रकाशन करताना प्रमुख पाहूणे नेरूळ पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक तानाजी भगत, अध्यक्ष अरूण रोडे,उपाध्यक्ष व मुख्य सचिव.



कोल्हापूर च्या सावित्रीबाई फुले महिला ज्येष्ठ नागरिक संघाचा स्वा.सेनानी कै.ना.कृ.किंकर उत्कृष्ट महिला संघाचा पुरस्कार कवयित्री सौ.मनिषा पाटील यांचे हस्ते स्विकारताना सौ. सुशिला ओडेयर.



नांदेड येथे मार्च २०२३ मध्ये होणाऱ्या महिला मेळाव्याच्या नियोजनाबाबत आयोजित कार्यक्रम प्रसंगी.



मिरज तालुका पेन्शनर असोसिएशन च्या पेन्शनर दिन कार्यक्रम प्रसंगी अपर कोषागार अधिकारी सौ.सुरेखा दौंड-जाधव, जिल्हा पेन्शनर असोसिएशनचे अध्यक्ष सुरेंद्र पेंडुरकर, फेस्कॉम उपाध्यक्ष अंजुमन खान यांचे यांचेसमवेत संचालक सदस्य

कृपया अंक पत्त्यावर द्यावा. वितरीत न झालेस सकारण परत करावा.
अपूर्ण पत्ता ☐ /मयत ☐/पत्ता सोडून गेले ☐/पोस्टमन बीट क्र. ☐

प्रेषक :

**श्री. अंजुमन खान**
**फेस्कॉम उपाध्यक्ष व प्रमुख, फेस्कॉम मनोयुवा कौन्सिल**
**अ/७, सुभाषनगर, ता. मिरज, जि. सांगली - ४१६ ४३७.**
**मोबा. ९४२२५८३००४**

**PRINTED MATTER**

प्रति,

______________________

______________________

______________________